महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३१४ वा | दिनांक : १३/१०/२०२५ | वार : सोमवार

## हिंमत असेल तर आरएसएसचे हेडक्वार्टर उध्वस्त करा - सुषमा अंधारेंचे मुख्यमंत्र्यांना आव्हान



**पुणे :** शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आव्हान केले आहे. त्या म्हणाल्या, तुमच्यात जर हिंमत असेल तर आधी बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या मनुवादी विचारांना कडाडून विरोध केला, त्या विचारांवर चालणारे आरएसएस हेडक्वार्टर उद्ध्वस्त करा, असे आव्हान अंधारे यांनी देवेंद्र फडणवीस यांना केले आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या, निवडणुकीच्या आधी हा हिंदू, तो मुस्लिम, हा मराठा, तो ओबीसी अशी तोडफोड करणं ही देवेंद्र फडणवीसांच्या महाराष्ट्रातील आजच्या राजकारणाची गरज आहे. कारण आज आणखी महत्वाचे प्रश्न प्रलंबित आहेत. पूरग्रस्त भागातील प्रश्न असतील, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न असेल, वाढती महागाई, पुण्यातील मुंबईतील वाढती गुन्हेगारी या सगळ्या विषयावर सपशेल अपयशी ठरलेल्या फडणवीसांना नॉन इशूवर चर्चा करणे ही त्यांची करीअरची गरज आहे. यासाठी त्यांनी त्यांच्या ब्रिगेडला आता बाबासाहेब आंबेडकरांचे नाव वापरायला सांगितले आहे. बाबासाहेब यांच्याबद्दल तुमचा आदर नक्की व्यक्त करा पण फडणवीस जरा सावधान. जरा सावधानतीने तुम्ही व्यक्त व्हा, असे अंधारे म्हणाल्या.

पुढे बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, बाबासाहेब यांच्याबद्दल खरंच प्रमे आदर असेल तर त्यांचे अनेक संदर्भ आणि दाखले द्यायचे असतील तर बाबासाहेब तुम्हाला इतके सहजासहजी पेलणारे झेपवणारे नाहीत. बाबासाहेब पचवायचे असतील तर त्यांनी मनुवादी विचारांना त्यांनी विरोध केला होता. फडणवीस तुम्हाला बाबासाहेबांचे तुम्हाला अनुयायी व्हायचे असतील तर तुम्ही मनुवादी विचारांचे केंद्र असलेल्या आरएसएसएसला उद्धस्त करा. त्यानंतर मग खाकी चड्डीवाले काळे टोपीवाले सगळे ओळीने दीक्षाभूमीवर उभे करा. तरच तुम्हाला बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेण्याचा अधिकार मिळेल. अन्यथा बाबासाहेबांचे नाव तुमच्या राजकारणासाठी वापरू नका.

सुषमा अंधारे यांनी एका व्हिडिओच्या माध्यमातून पुण्यातील गुन्हेगारीवर भाष्य केले आहे. त्या म्हणाल्या, स्वच्छ पुणे, सुंदर पुणे यासह सुरक्षित पुणे सुद्धा असले पाहिजे. त्यासाठी पक्षीय विचार बाजूला ठेऊन रवींद्र धंगेकर लढत आहेत. परंतु, धंगेकर यांचा विचार आणि आवाज दाबण्यासाठी ज्या पद्धतीने सत्ताधारी त्यांना धमकावत आहेत, हे किती अनाकलनीय आहे. एकीकडे राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणत आहेत की धंगेकर यांनी लक्षात ठेवावे की ते आता सत्ताधाऱ्यांच्या सोबत आहेत. याचा अर्थ काय दादा? असा सवाल अंधारे यांनी विचारला आहे.

पुढे बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, याचा अर्थ असा की सत्ताधाऱ्यांच्या चुका अजिबात कोणीही दाखवू नयेत. धंगेकरांनी इतर अंधभक्तांच्या सारखे डोळे झाकून सत्ताधाऱ्यांनी काहीही चुका केल्या आणि गुन्हेगारी कितीही वाढली तरी काहीच बोलू नये. दुसरीकडे देवेंद्र फडणवीस म्हणतात की मी धंगेकरांच्या बॉसशी बोलेल. अहो देवेंद्रजी धंगेकरांच्या बॉसशी काय बोलताय, धंगेकर बोलण्याआधी रामदास कदम यांनी जे बोलले त्यांच्याशी बोला. की सत्तेतला तो कोण बडा नेता आहे, ज्या बड्या नेत्याच्या आदेशाने योगेश कदम यांनी सचिन घायवळला शस्त्र परवाना दिला.

देवेंद्रजी हे अशा पद्धतीने धमकावणे, तुम्ही तर सत्ताधारी आमदारांना सुद्धा धमकावता आणि त्यांनी सुद्धा काय बोलावे आणि काय बोलू नये याचा रिमोट तुमच्याकडे असेल तर तुम्ही सामान्य लोकांना काय बोलू द्याल? असा सवाल सुषमा अंधारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला आहे.

## दादा तुम्हाला पैशांचे सोंग जमत नसेल तर खुर्ची सोडा - बच्चू कडू



**पुणे :** वित्त खाते तुमच्याजवळ असताना तुम्ही म्हणता पैशांचे सोंग जमत नाही. पैशांचे सोंग जमात नसेल तर खुर्ची सोडा, असे म्हणत प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांवर सडकून टीका केली आहे. इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथे आज शेतकरी कर्जमुक्ती एल्गार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत बच्चू कडू यांनी अजित पवार तसेच कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यावर टीका केली आहे.

बच्चू कडू म्हणाले, सकाळी ७ वाजता उठून तुम्ही शपथ घेतली. एवढे सोंग कोणाला जमले का दादा, कुठे गेली तुमची दादागिरी? वित्त खाते तुमच्याजवळ असताना तुम्ही म्हणता पैशांचे सोंग जमत नाही. जमत नसेल तर आम्हाला सांगा! मी सांगतो कसे सोंग करायचे. शक्तिपीठ महामार्गासाठी ८५ हजार कोटी तुमच्या निधीतून दिले. आम्ही रस्त्यातील खड्ड्याने मरतोय. दादा हे सोंग कसे जमले तुम्हाला? कोणाच्या खिशातून पैसा काढला तुम्ही? किती लुटले ते आम्हाला सांगा. माझा शेतकरी पाय घासून मरतोय त्यासाठी पैसा नाही. तिथे तुम्हाला पैशांचे सोंग जमत नसेल तर खुर्ची सोडा, अशी टीका कडू यांनी केली आहे.

बच्चू कडू यांनी यावेळी बोलताना अजित पवारांचे मागील काही वादग्रस्त वक्तव्यांचा दाखला देत टीका केली. मागे एकदा अजित पवार म्हणाले होते पाणी नाही तर, धरणात xxx का? या विधानावर भाष्य करत टीका करताना बच्चू कडू म्हणाले, खरोखरच xxx तर वाहत जाईल दादा, सापडणार ही नाहीत कोणत्या नदीत गेले, समुद्रात गेले, डोहात गेले तर, असे म्हणत कडू यांनी पवारांवर जहरी टीका केली.

पुढे बोलताना बच्चू कडू यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. ते म्हणाले, कृषिमंत्री शेतकऱ्यांसाठी भांडताना दिसला पाहिजे. नुसता शेपूट हलवणारा नकोय आम्हाला. मागे माणिकराव कोकाटे कृषिमंत्री होते. ते ओबडधोबड बोलत होते. ते घरी गेले. भरणे थोडे बरे बोलतात, कमीत कमी ते चुका तरी करत नाहीत. मात्र, शेपूट हलवणे बंद केले पाहिजे, अशी खोचक टीका कडू यांनी केली आहे. तुम्ही कृषिमंत्री आहात.. सबसे ज्यादा 'भार तुम्हारी तरफ' है... सर्वात जास्त संख्या शेतकऱ्यांची आहे, असेही बच्चू कडू म्हणाले.

## हुंडा घेणारे नामर्द! स्त्री टिकली नाही, तर समाज कसा टिकेल?- मराठी अभिनेते मकरंद



**अकोला :** हुंडा घेणारे नामर्द असल्याचे परखड मत मराठी चित्रपट अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी केले आहे. स्त्री जर टिकली नाही, तर समाज कसा टिकेल? असा सवाल अनासपुरे यांनी यावेळी केला आहे. अकोल्याच्या बाळापूर तालुक्यातील निंबा फाटा येथे कुणबी स्नेहमिलन सोहळ्याच्या सभेत बोलताना मकरंद अनासपुरे यांनी विविध विषयांवर आपले मत व्यक्त केले आहे.

यावेळी बोलताना मकरंद अनासपुरे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर देखील भाष्य केले. ते म्हणाले, देशात शेतकरी एकत्र आल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. तसेच कापूस आणि सोन्याच्या भावातील तफावतीवर बोलताना अनासपुरे म्हणाले, जर सोन्याचे भाव लाखाच्या वर गेले असतील, तर कापसाला भाव आणखीनही कमी कसा? असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला.

पुढे बोलताना मकरंद अनासपुरे म्हणाले, शेतकऱ्यांना उद्योजकांचा दर्जा का नाही? शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात बँका, पतसंस्था आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांनी शेतकऱ्यांकडून कर वसूल करू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. यावेळी मराठी अभिनेत्री गिरिजा ओक देखील उपस्थित होत्या. त्यांनी देखील सध्याच्या शेतकऱ्यांच्या अडचणीच्या परिस्थितीत सर्वांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले.

मराठी चित्रपटसृष्टीतील एक संवेदनशील अभिनेता आणि चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व म्हणून मकरंद अनासपुरे यांची ओळख आहे. त्यांनी आपल्या चित्रपटांतून अनेक महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर प्रभावीपणे भाष्य केले आहे. विशेषत:, त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी अभिनेता नाना पाटेकर यांच्यासह एकत्रितपणे 'नाम फाउंडेशन'ची स्थापना केली आहे. निंबा फाटा येथील कार्यक्रमात त्यांनी शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि मुद्द्यांवर परखड मत मांडले, जे त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ ऑक्टोबर २०२५

## महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष प्रणित बिरसा मुंडा ब्रिगेडच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी सोमीनाथ मोरे यांची निवड




**छत्रपती संभाजीनगर (ता. ११)** : ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय सुलतानपूर भांडेगाव येथे महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाची बैठक घेण्यात आली यावे ळेस वडोद बुद्रुक येथील ग्रामस्थांच्या समस्या ऐकून घेण्यात आल्या व त्यावर काय उपाययोजना करायचा आहेत व आगामी काळात येणाऱ्या निवडणुका कशा पद्धतीने लढायचे आहेत यावर सखोल चर्चा झाली त्यानंतर महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे सर्वे -सर्वा संस्थापक अध्यक्ष माननीय संजय भैय्या सोनवणे यांच्या आदेशाने व छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद )चे जिल्हाध्यक्ष राहुल जी. वडमारे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष प्रणित बिरसा मुंडा ब्रिगेड च्या मराठवाडा उपाध्यक्षपदी सोमीनाथ हरी मोरे यांची सर्व समक्ष नियुक्ती करण्यात तसेच महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या खुलताबाद तालुका संघटक किशोर जाधव,यांचीही नियुक्ती करण्यात आली ,संजय साबळे यांची खुलताबाद तालुका सल्लागार या पदी नियुक्ती करण्यात आली ,बबन राऊत यांची खुलताबाद तालुका सचिव पदी नियुक्ती करण्यात आली या वेळी जिल्ह्याचे संघटक रतन जाधव यांनी हार घालून त्यांचा सत्कार केला व जिल्ह्याचे अध्यक्ष राहुल जी. वडमारे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष प्रणित छत्रपती शंभुराजे ब्रिगेड जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र उबाळे, खुलताबाद तालुका अध्यक्ष मुबारक पठाण, सुलतानपूर ग्रामपंचायत सदस्य सुदाम सोनवणे, सुलतानपूर तालुका उपाध्यक्ष मलंग (बाबा) शेख, वडोद खुर्द चे उपसरपंच राहुल चव्हाण, सचिन हिवराळे , सदू सोनवणे ,अमोल गुंजाळ, साबळे ,सुरेश गायकवाड, मनोज पगारे, राजेश बागुल, पंकज कोतकर, संजय जाधव,या सर्व मंडळीच्या समोर हा नियुक्तीचा कार्यक्रम पार पडला...

## जिल्हा परिषद कन्या प्रशालेत "पैसे वाचवा, पुस्तके वाचा" उपक्रम संपन्न




**छत्रपती संभाजीनगर (कृष्णा शिंदे)** : प्रशालेतील "चला शिकुया नवे काही या मासिक कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि त्याचसोबत बचतीची सवय लागावी, यासाठी 'रीड अँड लीड फाऊंडेशन' च्या सहकार्याने जिल्हा परिषद कन्या प्रशाला औरंगपुरा येथे "पैसे वाचवा,पुस्तके वाचा" कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी 'रीड अँड लीड फाऊंडेशन' संचालक श्री.मिर्झा अब्दुल कय्युम गेल्या १५ वर्षापासून अथक प्रयत्न करत आहेत. याच प्रयत्नांना पुढे नेत, त्यांनी 'पैसे वाचवा, पुस्तके वाचा' (Save Money, Read Books) हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.या उपक्रमांतर्गत, मरियम मिर्झा मोहल्ला लायब्ररीच्या सहकार्याने हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना मोफत गुल्लक (पिग्गी बँक) वाटप केले जाते. आतापर्यंत ५०,००० गुल्लक वाटपाचा टप्पा पार करण्यात आला आहे.त्या अनुषंगाने आज प्रशालेमध्ये १०८ गुल्लकांचे वाटप करण्यात आले.*श्री.मिर्झा यांनी मुलांना प्रोत्साहित करतांना दिवाळीच्या "सुट्ट्यांमध्ये पालक आणि नातेवाईकांकडून मिळणारे पैसे या गुल्लकमध्ये जमा करावेत असे सांगीतले.सन्मान आणि अभिनंदनाचा क्षणयावेळी, 'रीड अँड लीड फाऊंडेशन'चे अध्यक्ष मिर्झा अब्दुल कय्युम नदवी यांचे वाचन आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. इतकेच नव्हे तर, मिर्झा यांची मुलगी, 'लाईब्ररी गर्ल' मरयम मिर्झा, जी मोहल्ला बाल पुस्तकालय अभियानची जनक आहे, तिला महाराष्ट्र साहित्य अकादमी चा पुरस्कार मिळाल्याबद्दल तिचेही अभिनंदन करण्यात आले.गुल्लक उपक्रमाचा उद्देशमिर्झा यांनी स्पष्ट केले की, टीव्ही आणि इंटरनेटमुळे विद्यार्थी पुस्तकांपासून दूर गेले आहेत. त्यामुळे त्यांना पॉकेटमनीमधून बचत करण्यास प्रोत्साहन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ही सवय विद्यार्थ्यांवर आर्थिक बोजा नाही, कारण ते त्यांच्या स्वतःच्या पॉकेटमनीमधून बचत करतील.शाळेतच भरणार पुस्तक प्रदर्शनया बचतीचा योग्य वापर व्हावा, यासाठी शाळेच्या सुट्ट्या संपल्यावर आणि वर्ग पुन्हा सुरू झाल्यावर मिर्झा अब्दुल कय्युम नदवी स्वतः शाळेत पुस्तक प्रदर्शन आयोजित करतील. विद्यार्थी या प्रदर्शनातून (किंवा शहरातील कोणत्याही प्रदर्शनातून) आपल्या जमा केलेल्या पैशांतून अभ्यासक्रमाशी संबंधित किंवा शैक्षणिक दर्जा वाढवणारी पुस्तके खरेदी करू शकतील.नक्कीच, मुख्याध्यापक आणि शिक्षकांचा हा आगळावेगळा उपक्रम विद्यार्थ्यांना केवळ वाचनासाठी प्रेरित करणाराच नाही, तर बचत आणि वाचन संस्कृतीला चालना देणारा एक क्रांतिकारी उपक्रम ठरेल. या कार्यक्रमात पाहुण्यांचा परिचय चेतना तायडे यांनी तर सुत्रसंचालन आयेशा बेगम व आभार ज्योती पवार यांनी मानले कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक कृष्णा शिंदे,सिमा बेगम,चेतना तायडे,मनिषा कोळी,आयेशा बेगम,ज्योती पवार,विलास क्षिरसागर, तुषार चव्हाण संपदा शिंदे,गजानन डफळ,स्वप्नील लोखंडे यांनी परिश्रम घेतले

## जिवनात प्रामाणिक आणि चिकित्सक रहावे : डॉ. जी. के. कुलकर्णी

**छत्रपती संभाजीनगर** : माणसाने आपण ज्या ठिकाणी काम करतो त्या ठिकाणी मन लावून काम केले पाहिजे, आयुष्यातील वेळ शिक्षण, संशोधनाच्या माध्यमातून सामाजिक विकासासाठी घालवला पाहिजे असे मत, डॉ. जी. के. कुलकर्णी यांनी त्यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले, यावेळी त्यांचे सर्व संशोधक विद्यार्थी, शिक्षण क्षेत्रातील तज्ञ आणि कुटुंबीय नातेवाईक यांची उपस्थिती होती.शहरातील हॉटेल द रिच येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. जी. के. कुलकर्णी यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांचे संशोधक विद्यार्थी, शिक्षण क्षेत्रातील तज्ञ व कुटुंबीय नातेवाईक यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते, या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांनी आपापले मते व्यक्त केली, तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी प्रा. डॉ. जी. के. कुलकर्णी यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल मनोगते व्यक्त केली. अद्विका सुरडकर, वृंदा कुलकर्णी, बाबुराव कुलकर्णी, अनिल देशमुख, अॅड. कोऱ्हाळकर, दिनेश फडके, किशन कुलकर्णी, डॉ. अश्विनी वैष्णव, डॉ. विशाल वैद्य, डॉ. अतुल चौरपगार, रुमाना शेख, डॉ. शैलेंद्र शेलार, डॉ. पप्पू कुदनर, डॉ. संतोष रणखांब, डॉ. प्रशांत जोशी, सायली सुरडकर यांनी मनोगते व्यक्त केले. याप्रसंगी सुत्रसंचलन किर्ती सीमंत प्रास्ताविक तानाजी जाधव तर आभार डॉ. गोपाळ भारस्वाडकर यांनी मानले, याप्रसंगी संशोधन आणि शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ ऑक्टोबर २०२५


# अभिनंदन संदेश






छत्रपती संभाजीनगर : आयुक्त तथा प्रशासक श्री. जी. श्रीकांत सर यांच्या संकल्पनेतून आयोजित "आम्हाला खेळू द्या" या उपक्रमांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय महानगरपालिका हद्दीतील रग्बी स्पर्धेच उद्घाटन श्री के बी चौधरी सरांच्या हस्ते झाले, व केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी महानगरपालिकाच्या विद्यार्थ्यांनी १९ वर्षाखालील मुलींच्या गटात द्वितीय क्रमांक मिळवला व उल्लेखनीय कामगिरी केली आहे . या उत्कृष्ट कामगिरीबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदनश्री. अंकुश पांढरे सर (उपआयुक्त, शिक्षण विभाग )श्री. गणेश दांडगे सर ( नियंत्रण अधिकारी ). श्री. संजीव प्रसाद बालया सर (मनपा क्रीडा अधिकारी). श्री. भरत तीनगोटे सर ( शिक्षण अधिकारी )श्री. ज्ञानदेव सांगळे सर ( समग्र शिक्षण अभियान अधिकारी )यांनी केले यामुळे विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावले* . शाळेचे मुख्याध्यापक श्री के बी चौधरी सर आणि सहशिक्षक श्री सचिन गायकवाड सर, संदीप सर यांनी दिलेले योग्य मार्गदर्शन तसेच क्रीडा प्रशिक्षक श्री. इरफान सय्यद सर, श्री दीपक महानवर सर यांचे कठोर परिश्रम व प्रभावी प्रशिक्षण यांच्या जोरावर विद्यार्थ्यांनी ही उत्कृष्ट कामगिरी साध्य केली .

## चंद्रावरची शाळा

स्वप्नात भरली
चंद्रावर शाळा
शाळेत नव्हता
खडू आणि फळा
शाळेत चालायचे
ऑनलाईन क्लास
प्रत्येक विद्यार्थ्याजवळ
संगणक खास
बटन दाबतांना
यायची खुप मजा
काही चुकले तरी
नव्हती कोणती सजा
स्कूल बस ऐवजी
छोटे छोटे यान
तिथं नव्हती
कशाचीच वान
सर्वांच्या आवडीचा
पी.टी.चा तास
चांदण्यांशी खेळतांना
मजा यायची खास
बटने दाबायची
एवढाच अभ्यास
रोज शाळेला आले की
झालात की पास !

**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव, जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## तळ्याच्या काठावर

तळ्याच्या काठावर उभ्या बाभळी या छान
पसरलं पाण्यावर किती हिरवं चांदण

बाभळीच्या फांद्यावर इवले इवले घरटे
निळयाशार पाण्यामधी त्याचे चित्र उमटे

अरे सावल्या झाडाच्या कशा फांद्यांशी बोलल्या
कुशीमध्ये रे तळ्याच्या किती चांदण्या उगल्या

शालू हिरवा नेसून अशी नटली धरती
दिसरात पाण्यामधी रोज मासे न्हातीधुती

बाभळींच्या गुजगोष्टी रोज कानात चालल्या
दोन चिमण्या हळूच वाऱ्यासवे रे बोलल्या

वर आभाळात सूर्य दुपारचा तापलेला
शेला सोनेरी किरणांचा धरतीला खेटलेला

गौताळयाच्या कुशीमध्ये ढगोबा रे विसावला
वारा क्षितिज भेटता लई हरखून गेला

रानवाऱ्याचा सुगंध साऱ्या जगी पसरला
माय मातीला भेटण्या जसा स्वर्ग उतरला

**ज्ञानेश्वर गायके,कन्नड**
**थेट गौताळयातून...**

## टाटा इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंगमध्ये मुलींसाठी नोकरीची सुवर्णसंधी!




**उमरगा :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात मुलींसाठी २५० जागांसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे होसुर (तामिळनाडू) येथील नामांकित टाटा इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनीत मुलींसाठी नोकरीची उत्कृष्ट संधी उपलब्ध होणार आहे. इच्छुक उमेदवारांची मुलाखत सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे होणार आहे.मुलाखतीसाठी किमान पात्रता बारावी उत्तीर्ण आणि वय १८ ते ३० वर्षे यादरम्यान असावे. निवड झालेल्या मुलींना प्रति महिना ₹१९,१३४ वेतनासह प्रॉव्हिडंट फंड व इतर सर्व सुविधा उपलब्ध असतील तसेच राहण्याची, चहा व जेवणाची व्यवस्था कंपनीकडून केली जाईल. शिवाय नेमणुकीनंतर उमरगा ते होसुर प्रवासासाठी रेल्वे तिकीट कंपनीतर्फे मिळणार आहे. त्यामुळे या सुवर्णसंधीचा पात्रता धारक गरजू मुलींनी लाभ घ्यावा आणि रोजगार मिळवावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि महाविद्यालयातील प्लेसमेंट सेलचे प्रमुख डॉ. सूर्यकांत रेवते यांनी केले आहे.





महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ ऑक्टोबर २०२५

# बालकविता संग्रह :- अंगत पंगत





कविवर्य :- अय्युब पठाण लोहगावकर यांनी बालकवी म्हणूनही साहित्य क्षेत्रात ठसा उमटवल्याचे दिसून येते. 'अंगत पंगत' हा त्यांचा पाचवा बालकवितासंग्रह जो सन 2025 मध्ये प्रकाशित होत आहे. अंगत पंगत या कवितासंग्रहात:- जादूचे झाड, बहरलेली बाग,फळा, पिंकीची शाळा, सहल, कोकिळाताई, मातीचा गल्ला, आजोबा, कष्टाची शिकवण, मोबाईल, वृक्षांच्या छायेत, सुरू झाली शाळा, लाडोबा, दिवाळीचा सण, साखरेचा रूसवा, बैलगाडी, मामाच्या गावाला, पाऊस आला, मच्छरराव, रोप, चिमणी, उंटदादा, वसा स्वच्छतेचा, संगणकदादा, लहान मुलांनो, फुलपाखरा, उन्हाळा, ढगा रे ढगा, पर्यावरण, गोष्टीचे पुस्तक, कावळा, मातृभूमी, ससा रे ससा, मुंगीचे लग्न, प्राणी जगत, अंगात पंगत अशा एकूण 36 कवितांचा समावेश केलेला आहे . कवीच्या कल्पनेतून उगले एक जादूचे झाड आणि जादूच्या झाडाला येणाऱ्या फांद्या आणि फळांचे वर्णन करीत, कवीने बाल मनावर रुजणारे शब्दसंस्कार केल्याचे प्रत्येक कवितेतून दिसून येते. प्रत्येक कविता ही नव्याने फुलताना दिसते. छोटे छोटे क्षण आपल्या लेखणीतून नव्या शृंगारात टिपलेले दिसते. प्रत्येक कवितेची प्रत्येक ओळ, शब्द निशब्द , आणि कवितेचा भाव वाचकाला सहज उलगडत जाईल अन् मधुर शब्द साठा गुंफून बालसाहित्याच्या चौकटीला अगंत पंगत काव्यसंग्रहाचे तोरण बांधावे एवढा तो सन्मानाचा बालकविता संग्रह झाला आहे हे म्हणणं वावगं ठरणार नाही. प्रत्येक कवितेतून निवडलेल्या मधुर ओळी कवितेच्या नावापुढे स्पष्टपणे अधोरेखित केल्या आहे. वाचकाला त्या पटकन आपलंसं करून घेतील. अशा त्या ओळी आहे. सोनेरी फांद्यांना विविध फळांचा बहर, आस्वाद घेण्यासाठी राघू-मैना करी कहर, बहरलेली बाग या कवितेत निसर्गाचे गुणगान गात कवी म्हणतो :- मनमोहक बाग फुलून दिसती ,धिंगा मस्ती करीत मुले आनंदाने हसती. फळा या कवितेत कवी शैक्षणिक मत व्यक्त करत :- माझ्या अंगावर फुलतो, नेहमीच अक्षरांचा मळा ,प्रत्येक विद्यार्थी घडतो, ज्ञानाचा लावूनी टिळा. पिंकीची शाळा या कवितेत कवी मन फुलवत :- शाळेला जा आता हाती दप्तर घेऊन, राष्ट्रगीत म्हण, रांगेत उभे राहून. सहल या कवितेत कवी उत्साही होत :- मोटारीत बसून आपण सहलीला जाऊ, गर्द हिरवी झाडे ,सारी पळताना पाहू. कोकिळाताई या कवितेत कवी शब्द सूरबद्ध करत :- कोकिळाताई कोकिळाताई किती गोड तुझा गळा ? आम्हाला शिकविण्यासाठी घे ना गं गायनशाळा. मातीचा गल्ला या कवितेत कवी बालकातला समजदारपणा सांगत :- आईच्या वाढदिवसाला घेतली एक भरजरी साडी , पाटावर बसविले आईला लावून लाडी गोडी . आजोबाची व्यक्तिरेखा शब्दात रेखाटत कवी म्हणतो :- कविता म्हणतात हरपून भान ,भातुकली खेळतांना होतात लहान. कष्टाची शिकवण या कवितेतून एकतेचे अन् धाडसेचे महत्त्व सांगत कवी म्हणतो :- संकट येता तुझ्यावर एकजूटीने देतेस लढा, कुठे शिकलीस तू हा एकतेचा धडा ?. मोबाईल या कवितेत मोबाईलने केलेले वाईट संस्कार कवी सांगत :- नजर होते कमजोर वेळीच आता सावरा, खेळण्यास काढून वेळ आता मैदानात वावरा. वृक्षांच्या छायेत या कवितेत वृक्ष किमया गात कवी म्हणतो:- परोपकारांच्या भावनेने वृक्ष सदा देतच राहतो. जीवन कसे जगावे जणू मानवास सांगतो. सुरू झाली शाळा या कवितेत शाळेचे महत्त्व सांगत कवी म्हणतो :- विद्येचे मंदिर, सुंदर माझी शाळा जीवनात फुलविते, ज्ञानाचा मळा . लाडोबा या कवितेत नात्यात प्रेमाचे रंग भरत कवी म्हणतो:- तरी आई म्हणते, लाडोबा आमचा गुणी त्रास जरी दिला तरी मारु नका त्याला कुणी..?. दिवाळीचा सण संस्कृती जपत कवी या कवितेतून म्हणतो :- दिवाळीचा सण, बहीण बसली नटून भावाला ओवाळायला, आतुरले तीचे मन. साखरेचा रुसवा या कवितेतून अति गोडाचा अतिपणा कवी सांगत म्हणतो :- पाहूणे घरी येता ,ताटात नसे गोड, रुसलेल्या साखरेने , सर्वांची मोडली खोड. बैलगाडी या कवितेतून इंधन युक्त वाहणाचा निसर्गावर होणारा दुष्परिणाम सांगत कवी म्हणतो :- ना लागे इंधन, ना निघे धूर ,घुंघरांच्या आवाजात धावते दूर दूर. मामाच्या गावाला या कवितेतून नाते आणि आठवणी जपत कवी म्हणतो:- मामाच्या शेताची, नागमोडी वळणाची वाट ,ज्वारीचे कणसे, बहरली दाट. पाऊस आला या कवितेतून पावसाळा सांगत कवी म्हणतो:- पाऊस आला सुटला गार वारा ,विजांचा कल्लोळ ढग वाजवी नगारा. मच्छरराव या कवितेत मच्छरावर प्रहार करत कवी म्हणतो :- जरी जीव तुझा लहान आहेस मात्र तू भक्षक , एकविसाव्या शतकातील, तू महाभयंकर राक्षस. रोप या कवितेत कवी म्हणतो:- खळ खळ खळ, वाहते पाणी रानपाखरे गाती गाणी. चिमणी या कवितेतून कवी चिमणीची जीवन गाथा व्यक्त करत म्हणतो :- कधीच ना दिसे दु:खी ना कष्टी ,सुखी जीवनाच्या जणू सांगते गोष्टी. उंटदादा या कवितेतून कवी उंटाचा जगणं रेखाटत म्हणतो :- ना तुला थकवा ना तुला आराम, तप्त वाळूतून चालून किती रे करतोस काम, वसा स्वच्छतेचा या कवितेत कवी म्हणतो :- प्लास्टिकचा वापर कायमचा टाळू , पर्यावरण संरक्षणाचे सारे नियम पाळू . संगणकदादा या कवितेतून कवी आधुनिक युगाचे नवे रुप सांगत कवी म्हणतो :- संगणक दादा संगणक दादा तू आहे ज्ञानाची खाण, एकविसाव्या शतकातला तू जीव की प्राण. लहान मुलांनो या कवितेत कवी म्हणतो :- हिमतीने करा संकटांवर मात, गरजवंतांना द्या मदतीचा हात. फुलपाखरा या कवितेत कवी म्हणतो :- जीव तुझा चिमुकला तरी धडपड करतोस भारी, एकदा तरी खेळायला ये ना आमच्या घरी. उन्हाळा या कवितेत कवी व्यक्त होत :- झाड देते गार सावली, सोसूनी उन्हाच्या झळा. ढगा रे ढगा या कवितेत:- डुलत डुलत मग पळशील. सवंगड्या संगे लपंडाव खेळशील पर्यावरण कवितेतून पर्यावरणाचे महत्त्व सांगत कवी म्हणतो :- पर्यावरणाची कुणी , करु नका हानी, अन्यथा ढगातून कसे पडणार पाणी, गोष्टीचे पुस्तक या कवितेत कवी गोष्ट सांगत लळा लावत लामन लावत म्हणतो :- पुस्तकामुळे वाढली, वाचण्याची आवड. पुस्तक घेऊन बसतो, रोज काढून सवड, कावळा या कवितेत कवी म्हणतो :- कोण येणार पाहुणा, सांग त्याचे नाव. मातृभूमी या कवितेतून कवी मातृभूमीचे गुणगानगात म्हणतो:- साऱ्या विश्वात उजळो , माझ्या मातृभूमीचे नाव ,इथे सदा नांदत राहो, अखंडता आणि बंधूभाव. ससा रे ससा या कवितेत कवी पैंजचा ससा सांगत म्हणतो :- पैंज जिंकण्याची तू , वेडी आशा सोड कासवाने मोडली, तुझी चांगलीच खोड. मुंगीचे लग्न या कवितेत कवी कल्पना करत :- हुंडा ठरला गुळाचा खडा, नवरीचा केला साखरपुडा. प्राणी जगत या कवितेत कवी प्राण्यांच जगणं मानवी आयुष्याशी काल्पनिक तुलनात्मक जुळवत कवी म्हणतो :- हत्ती भाऊ हत्ती भाऊ, सोंड तुझी लांब, मुंगीला पाहून धावू नकोस लांब. अंगत पंगत या कवितेतून एकतेची, मानवतेची, प्रेमाची संगत घालत कवी लिहितो:-अंगणात बसली अंगत पंगत ,पदार्थांची होती न्यारीच रंगत अंगत पंगत या संपूर्ण बाल कवितासंग्रह नजरे खालून जाताना कवितेच्या प्रत्येक शब्दा शब्दातून कवीने भन्नाट जादूच केलीली दिसून येते. छोट्या छोट्या चिमुकल्यासाठी, सोपे सोपे गोड शब्दातून, बालमनावर रुजणाऱ्या भावना कवीने या संपूर्ण कवितासंग्रहातून न्यायपूर्वक मांडण्याचा पुरेपूर प्रयत्न केल्याचे दिसून येते. हसत खेळत सहज आपलेसे वाटावे शब्द बोलीतले इतक्या सोप्या बोलीभाषेतील कवीने बालमनाच्या भावना अंगत पंगत मध्ये बहुरंगी केलेल्या दिसतं आहे. बहुरंगी भावनेचा, इंद्रधनुष्याच्या सात रंगात, सात सुरांमध्ये सोप्या बोलीभाषेत शब्दांकित केल्याचे वास्तव कविवर्य अय्युब पठाण यांच्या अगंत पंगत या बालकविता संग्रहातून दिसून येते. जेष्ठ साहित्यिक कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या बालकविता फुलत जावो. कोवळ्या मनावर गंध शब्दांचा दरवळत जावो. बालमनावर नाजूक फुले, शाळेच्या बागेतली, शब्दांच्या बागेत रमावी. शाळेच्या अंगात मुलांच्या संगतीला, कविता बागडावी. शाळेच्या मैदानात शब्द शब्दांची फुले फुलावी. कवितेची एक ओळ तरी मुलांनी घरी न्यावी. अशा साऱ्या सदिच्छा... कविवर्य अय्युब पठाण सरांच्या अगंत पंगत या बाल कविता बालमनावर काव्य फुले होऊन फुलत जावो ह्याच अगंत पंगतला भरभरुन शुभेच्छा...



**समीक्षक :-लक्ष्मण गं. वाल्डे**<br>
**बालकविता संग्रह :- अंगत पंगत**<br>
**कवी :- अय्युब पठाण लोहगावकर**<br>
**प्रकाशन :- लीला साहित्य प्रकाशन-पुणे**<br>
**पृष्ठसंख्या :- 40**



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ ऑक्टोबर २०२५

# धर्मांतर घोषणा वर्धापनदिन : सामाजिक परिवर्तनाचा क्रांतिकारी प्रवास

13 ऑक्टोबर हा दिवस भारतीय सामाजिक इतिहासात एका विलक्षण क्रांतीचा साक्षीदार आहे. 1935 मध्ये 13 ऑक्टोबर या दिवशी येवला (जिल्हा नाशिक) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "मी हिंदू धर्म सोडणार आहे" अशी घोषणा करून एका अशा ऐतिहासिक चळवळीची मुहूर्तमेढ रोवली, ज्याने भारतीय समाजाच्या रचनेला आणि विचारविश्वाला नवा आकार दिला. म्हणूनच हा दिवस *'धर्मांतर घोषणा वर्धापनदिन'* म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. तो फक्त एका धार्मिक निर्णयाचा दिवस नाही, तर भारतीय समाजाच्या आत्ममुक्तीचा, सन्मानाच्या जागृतीचा आणि मानवी स्वातंत्र्याच्या उद्घोषाचा दिवस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवन हे अन्याय, अस्पृश्यता आणि जातीय अत्याचारांविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक होते. ते केवळ कायदेतज्ज्ञ नव्हते; ते एक चिंतनशील क्रांतिकारक, समाजशास्त्रज्ञ आणि मानवतावादी होते. त्यांनी ज्या समाजात जन्म घेतला, त्या समाजाने त्यांना अस्पृश्यतेच्या विळख्यात ढकलले होते, पण त्यांनी त्या विषमतेवर मात करून संपूर्ण मानवजातीला जागवणारा विचार दिला. "जात ही धर्माची देणगी नाही, आणि धर्म जर विषमता शिकवत असेल, तर असा धर्म माणसाचा शत्रू आहे," अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. या विचाराची सर्वात ठोस अभिव्यक्ती म्हणजे त्यांची धर्मांतर घोषणा होय. 1935 साली झालेल्या येवला येथील त्या परिषदेला हजारो लोक उपस्थित होते. बाबासाहेबांनी त्या दिवशी जाहीर केलं की *'मी हिंदू धर्माचा जन्माने आहे, पण मृत्यूने नाही.'* ही घोषणा केवळ वैयक्तिक नकार नव्हती, तर संपूर्ण सामाजिक क्रांतीचा प्रारंभबिंदू होती. त्यांनी हिंदू धर्माच्या चौकटीत सुधारणा शक्य नाही, हे ओळखले होते. त्या काळात त्यांनी म्हटले होते की, 'आपण या धर्मात राहिलो, तर आपल्याला कधीच समानता आणि सन्मान मिळणार नाही. त्यामुळे आपल्याला हा धर्म सोडून जाणे भाग आहे.' त्या घोषणेने भारतीय समाजात एक गडगडाट केला. उच्चवर्णीय धार्मिक शक्ती हादरल्या, आणि दलित समाजात एक नवसंजीवनी निर्माण झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली, पण ते कोणत्या धर्मात जाणार हे त्या वेळी निश्चित केले नव्हते. कारण त्यांच्यासाठी धर्म बदलणे म्हणजे श्रद्धा बदलणे नव्हते; ते एक विचारांतर होते, अन्यायाच्या प्रणालीपासून मुक्त होण्याची प्रक्रिया होती. पुढील दोन दशकांत त्यांनी ख्रिश्चन, इस्लाम, शीख, बुद्ध, इत्यादी धर्मांचा सखोल अभ्यास केला. त्यांना असा धर्म हवा होता जो माणसाला समानतेने वागवेल, बुद्धीला स्वातंत्र्य देईल आणि जीवनात नैतिकतेचा अधिष्ठान देईल. अखेरीस त्यांनी बौद्ध धम्माची निवड केली, कारण बुद्ध धम्मात *तर्क, करुणा, समता आणि अहिंसा* ही मूल्ये होती, जी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाशी पूर्णतः जुळणारी होती. पण 1935 ची ती घोषणा हेच खरे टर्निंग पॉइंट ठरले. त्या दिवशी त्यांनी दलित समाजाला जागवले की गुलामी ही केवळ सामाजिक किंवा आर्थिक नाही, ती मानसिक आहे, आणि त्या मानसिक गुलामीतून मुक्त होण्यासाठी धर्मांतर हे आवश्यक आहे. धर्मांतर म्हणजे नव्या समाजरचनेची पायाभरणी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माला एक सामाजिक संस्था म्हणून पाहिले. त्यांच्या मते, "धर्म जर मानवी मूल्यांना तोडत असेल, तर तो समाज नष्ट करतो." म्हणून त्यांनी धर्मांतराला सामाजिक सुधारणा म्हणून मांडले, आणि त्यामुळे ही चळवळ धार्मिक स्वरूपाची असली तरी तिचा मूळ गाभा हा *सामाजिक न्याय आणि मानवमुक्ती* होता. 13 ऑक्टोबरची ती घोषणा झाल्यानंतर भारतातील दलित, शोषित, वंचित वर्गात नवा आत्मविश्वास निर्माण झाला. लोकांना आपल्या दु:खाचे मूळ धर्मातील विषमतेत असल्याचे उमगले. हजारो कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार सुरू केला. त्यांच्या या विचारसरणीला अनेकांनी धार्मिक विरोधही केला, पण सामाजिक परिणाम मोठे झाले. हिंदू धर्मातील सुधारकांना जातीसंस्थेवर विचार करावा लागला. देशभरात समता, बंधुता, आणि धार्मिक स्वातंत्र्यावरील चर्चा सुरू झाल्या. हे सर्व त्या एका घोषणेचे सामाजिक परिणाम होते.

14 ऑक्टोबर 1956 रोजी अखेर बाबासाहेबांनी नागपूर येथे दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. त्या दिवशी त्यांनी "मी बौद्ध धर्म स्वीकारतो" असे म्हणताना समाजाला नव्या युगात नेले. हे धर्मांतर केवळ धार्मिक नसून, तो एक सांस्कृतिक आणि नैतिक पुनर्जन्म होता. "धम्मचक्र प्रवर्तन दिन" म्हणून आजही 14 ऑक्टोबर साजरा केला जातो, पण त्याची बीजे 13 ऑक्टोबर 1935 च्या घोषणेतच पेरली गेली होती. म्हणूनच 13 ऑक्टोबरचा दिवस हा भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे. या घोषणेने धर्म आणि समाज यांच्यातील नाते पुन्हा परिभाषित केले. धर्म हा माणसासाठी असावा, समाजाच्या शोषणासाठी नव्हे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगाला दाखवले. त्यांनी धर्मांतराच्या माध्यमातून "मानवधर्म" या संकल्पनेचा उदय घडवला. त्यांच्या मते, खरा धर्म तोच जो माणसाला विचार करण्याचे स्वातंत्र्य देतो, स्त्री–पुरुष समानतेचा आदर करतो, आणि अहिंसेच्या मार्गाने समाजात न्याय निर्माण करतो. बौद्ध धम्माने हे सर्व मूल्ये दिली, आणि म्हणून त्यांनी तो स्वीकारला. धर्मांतर म्हणजे नव्या जीवनाचा मार्ग, नव्या मूल्यांचा अंगीकार, आणि नव्या सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा संकल्प होय.

आज 89-90 वर्षांनंतरही त्या घोषणेचे महत्त्व कमी झालेले नाही. भारतीय समाज अजूनही जात, धर्म, आणि वर्ण यांच्या भिंतींमध्ये अडकलेला दिसतो. सामाजिक न्यायाची लढाई अजून अपूर्ण आहे. अनेक ठिकाणी दलितांवर अत्याचार, अस्पृश्यतेचे प्रकार, धार्मिक द्वेष, आणि विषमता कायम आहे. या पार्श्वभूमीवर धर्मांतर घोषणा वर्धापनदिन आपल्याला पुन्हा एकदा आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडतो की आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्या संदेशापासून किती दूर गेलो आहोत? धर्मांतर घोषणा म्हणजे फक्त धार्मिक पातळीवरील बदल नव्हता, तो मानसिक आणि सामाजिक परिवर्तनाचा शंखनाद होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारात धर्म म्हणजे मानवकल्याणासाठी असलेली नैतिक व्यवस्था. त्यांनी धर्माला शोषणाचे साधन नव्हे, तर परिवर्तनाचे साधन बनवले. म्हणूनच हा दिवस स्मरण करून देतो की खरी क्रांती मनात घडते, धर्म बदलला तरी जर विचार बदलला नाही, तर समाज बदलणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हणूनच सांगितले होते, *"मी धर्म बदलतोय, पण माझे उद्दिष्ट माणूस बदलणे आहे."*

या घोषणेनंतर बौद्ध चळवळ महाराष्ट्रात आणि भारतभर फोफावली. लाखो लोकांनी बौद्ध धर्म स्वीकारला, शिक्षण, जागृती आणि आत्मसन्मान यांचा स्वीकार केला. पण आंबेडकरांची अपेक्षा केवळ धर्मांतरापुरती नव्हती; ती होती विचारांतराची. आज आपल्याला त्या विचारांतराला नव्या पिढीपर्यंत पोहोचवायचं आहे. बौद्ध धर्मातील *त्रिशरण आणि पंचशील* ही तत्त्वे, बुद्ध, धम्म आणि संघात शरण जाणे; हत्या, चोरी, असत्य, व्यभिचार, आणि मद्यत्याग टाळणे ही केवळ धार्मिक नियम नसून मानवी आचरणाचे मार्गदर्शक आहेत. आंबेडकरांनी हे सामाजिक नैतिकतेचे शास्त्र म्हणून स्वीकारले. धर्मांतर घोषणा वर्धापनदिन साजरा करणे म्हणजे त्या घोषणेच्या भावनेचे पुनरुज्जीवन करणे. या दिवशी देशभरात येवला आणि नागपूर येथे लाखो अनुयायी जमून त्या घोषणेची आठवण करतात. आजच्या काळात धर्मांतर हा शब्द अनेकदा वादग्रस्त ठरतो. काही ठिकाणी राजकीय हेतूने या विषयाचा गैरवापर केला जातो. पण आंबेडकरांचे धर्मांतर हे कुठल्याही धार्मिक प्रलोभनामुळे नव्हते; ते बौद्धिक आणि नैतिक निर्णय होते. त्यांनी धर्मांतराला वैचारिक मुक्तीचा मार्ग बनवला. त्यांच्या मते, खऱ्या अर्थाने धर्मांतर म्हणजे *मनुष्याच्या आत्मसन्मानाचा पुनर्जन्म* होय. म्हणूनच धर्मांतर घोषणा वर्धापनदिन हा दिवस आपण "माणूसपणाचा उत्सव" म्हणून साजरा केला पाहिजे.

आज देशात आणि जगात असहिष्णुतेचे, धार्मिक द्वेषाचे वातावरण वाढत आहे. अशा वेळी डॉ. आंबेडकरांची धर्मांतर घोषणा आपल्याला पुन्हा "मानवतेचा धर्म" शिकवते. ती सांगते की "धर्म जर विभाजन निर्माण करत असेल, तर तो धर्म नाही; जो एकता आणि करुणा निर्माण करतो, तोच खरा धर्म आहे." धर्मांतर घोषणा म्हणजे विभाजन नव्हे, तर एकात्मतेचा नव्या स्वरूपातील प्रयत्न आहे. ती व्यक्तीला विचारशील बनवते, आणि समाजाला समतेकडे नेते. आजच्या पिढीसमोर नवे प्रश्न आहेत, धर्माच्या नावावर हिंसा, राजकारणातील द्वेष, जातीय गटबाजी, आर्थिक विषमता, स्त्रीविषयक असमानता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून आंबेडकरांनी दिलेला मार्ग अजूनही तितकाच प्रभावी आहे: *"शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा."* धर्मांतर घोषणा वर्धापनदिन आपल्याला आठवण करून देतो की या संघर्षाची दिशा केवळ राजकीय नाही, ती मानसिक आणि नैतिक असली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या जीवनात समतेची, करुणेची आणि न्यायाची मूल्ये अंगीकारली, तर खरी "धम्मक्रांती" घडेल.



***डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)***
**मो. क्र. 9960103582, ईमेल –**
**bagate.rajendra५@gmail.com**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002